## नियमित दिवाणी दावा क्र. ९१ सन २०२२

## निशाणी २७ खालील आदेश

०१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

०२. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे विरुध्द झालेला विना कैफियतचा आदेश रद्द करुन त्यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेणेस परवानगी मिळावी यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादी क्र.१ यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, सदर दाव्यात प्रतिवादी यांनी मुदतीत कैफीयत सादर केलेली नसल्याने दिनांक १२ जानेवारी २०२३ रोजी विना कैफीयतीचा आदेश करण्यात आलेला होता. प्रतिवादी यांना वेळेत आवश्यक कागदपत्रे व माहीती न मिळाल्याने मुदतीत कैफीयत दाखल करणे शक्य झालेले नाही. तरी सदरचा विना कैफीयत आदेश रद्द न झाल्यास त्यांची बाजू त्या न्यायालयासमोर मांडता येणार नाही. तसेच त्यांच्या बचावावर परिणाम होणारा आहे. प्रतिवादी यांची कैफीयत दाखल न झाल्यास त्यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सबब प्रतिवादी यांनी विना कैफीयतीचा आदेश रद्द होवून त्यांची कैफीयत दाखल करण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०४. वादींनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध दर्शविलेला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, सदर अर्जावर आवश्यक तो आदेश खर्च आकारुन पारीत करावा अशी विनंती केलेली आहे.

०५. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१ हे दिनांक ११ ऑगस्ट सन २०२२ रोजी आपल्या विधिज्ञांमार्फत याकामी हजर झाले आहेत. त्यानंतर त्यांनी कैफियत देणेकामी मुदत मागून घेतली आहे. परंतु, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम १ अन्वये प्रतिवादी यांस उचित संधी देवून देखील त्यांनी विहीत मुदतीत आपली कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादींना दाव्याच्या गुणदोषावर कैफीयत सादर

करण्यास आवयश्यक ती कागदपत्रे जमावाजमव करुन त्यांना न्यायालयात मुदतीत कैफियत देता आली नाही असे कारण प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केले आहे. प्रतिवादींनी त्यांना नेमकी कोणती कागदपत्रे कैफीयतीकामी उपलब्ध झाली नाहीत असे पुराव्यानिशी दाखविलेले नाही, त्यामुळे त्यांनी अर्जातील नमुद कारण पुरेसे नाही. तरीही नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादींना दाव्यामध्ये आपली लेखी कैफियत दाखल करुन त्यांचा बचाव मांडण्याची संधी देणे योग्य होईल. कारण वादीने सदरचा दावा सरस निरस धडेवाटप होऊन कायम ताकीदीकरीता दाखल केला आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादीस आपली कैफियत मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरेल. त्यामुळे प्रतिवादीची कैफीयत अभिलेखावर घेतल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असणारा खरा वाद अंतिमरित्या न्यायनिर्णित करण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. तसेच प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्याने वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही या निर्णयाप्रत मी आलो आहे. असे असले तरी प्रतिवादी क्र. १ यांची प्रस्तुतची कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबामुळे न्यायालयाच्या त्याच बरोबर वादीचा बहूमुल्य वेळ वाया गेलेला आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ यांच्यावर उचित खर्च आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र. १ यांचा प्रस्तुतचा अर्ज रु.२००/– इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी एकूण खर्च रक्कम रु.२००/– वादी यास अदा करावी, त्यानंतर त्यांची कैफियत दाखल करुन घेणेत येईल.

सही/–

कुडाळ.
दिनांक : ११/०१ /२०२४

( पी. आर. ढोरे)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
कुडाळ.